# स्तनांच्या कर्करोगावरील औषधाच्या संशोधनास पेटंट

## शिवाजी विद्यापीठातील संशोधकांची कामगिरी



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** स्तनांच्या कर्करोगाबाबत सर्वसामान्य पेशींना अपाय न करता केवळ कर्करोगाच्या पेशींना लक्ष्य करणाऱ्या औषधाविषयी यशस्वी संशोधन केले असून त्याचे भारतीय पेटंट येथील दोघा शास्त्रज्ञांना प्राप्त झाले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक डॉ. गजानन राशिनकर आणि त्यांचे विद्यार्थी डॉ. प्रकाश बनसोडे यांनी ही कामगिरी केली असल्याचे सांगण्यात आले.

भारतात महिलांमधील स्तनांच्या कर्करोगाचे प्रमाण खूप वाढले आहे. स्तनांचा कर्करोग हा जटिल आजार आहे.

कर्करोगाच्या उपचार पद्धतींमध्ये रुग्णाला उपचारा दरम्यान होणाऱ्या दुष्परिणामांना (साईड इफेक्ट्स) सामोरे जावे लागते. तसेच कर्करोगावरील औषधांमध्ये आढळणाऱ्या प्रतिरोधामुळे (ड्रग रेजिस्टन्स) सातत्याने नवनवीन संशोधनातून विकसित केलेल्या औषधांची गरज भासत असते. रसायनशास्त्र अधिविभागामध्ये यासंदर्भात संशोधन झाले असून त्यास पेटंट प्राप्त झाले आहे.

### असे आहे संशोधन...

रुग्णांना 'केमोथेरपी' उपचारांदरम्यान या औषधांच्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. स्तनांच्या कर्करोगावर उपयुक्त 'टॅमॉक्सीफेन' या औषधाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी व उपचाराची उपयुक्तता वाढविण्यासाठी 'फेरोसीन' हा घटक वापरून 'फेरोसीफेन' हे उपयुक्त औषध तयार करण्यात संशोधकांना यश आले आहे. फेरोसिन हा घटक मानवी शरीरास अपायकारक नाही, हे या संशोधनातून सिद्ध झाले आहे. या चाचणीच्या अहवालात असे आढळून आले, की ही संयुगे कर्करोगाच्या पेशींना पूर्णपणे नष्ट करतात; परंतु शरीरातील सामान्य पेशींना मात्र अपाय करीत नाहीत, इतकी ती सुरक्षित आहेत.

# भौतिकशास्त्र अभ्यास मंडळाचे प्रा. डॉ. केशव राजपुरे अध्यक्ष



प्रा. डॉ. राजपुरे

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. केशव राजपुरे यांची भौतिकशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली. त्यांनी महिन्यापूर्वीच अधिविभाग प्रमुखपदाचा पदभार स्वीकारला आहे.

प्रा. पी. एस. पाटील यांच्या प्र-कुलगुरूपदी निवडीमुळे अभ्यासमंडळाचे अध्यक्षपद रिक्त होते. आज डॉ. राजपुरे यांना विद्यापीठ प्रशासनाकडून नियुक्तीचे पत्र प्राप्त झाले. या नियुक्तीमुळे त्यांचे नाव शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या सभासद यादी मध्येदेखील गेले आहे. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी प्लॉस बायोलॉजी या नियतकालिकात शास्त्रज्ञांची यादी प्रसिद्ध केली होती. त्यात प्रा. राजपुरे यांचा समावेश आहे.

# समितीच्या सूचनेनुसार महाविद्यालये सुरू करणार

## कुलगुरू डॉ. डी .टी. शिर्के यांची माहिती

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठांतर्गत येणारी महाविद्यालये सुरू करण्यासाठी शासन आदेशानुसार एक समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अहवालानुसार मार्गदर्शक सूचनांनुसार १५ फेब्रुवारीला महाविद्यालये सुरू करण्यात येतील, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज दिली.

राज्यातील महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील महाविद्यालये कशा पद्धतीने सुरू करावीत याबाबत विद्यापीठाने पूर्वीच व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यांची समिती नेमली होती. ही समिती महाविद्यालये कशी पद्धतीने सुरू करावीत याबाबतच्या मार्गदर्शक सूचना सर्व महाविद्यालयांना पाठवणार आहे. त्यानुसार महाविद्यालये सुरू होतील. याच पद्धतीने विद्यापीठातील सर्व अधिविभागही सुरू होणार आहेत. विद्यापीठाची वसतीगृहे कोव्हीड रुग्णांसाठी वापरण्यात आली होती. ११ महिन्यांपासून ती प्रशासनाकडे आहेत. अधिविभाग सुरू झाल्यावर दुसऱ्या टप्प्यात वसतीगृहे सुरू केली जातील. येथे निर्जुंतुकीकरणाची प्रक्रिया राबवली जाणार आहे. अशी माहिती कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांनी दिली.

# Colleges in state to reopen on Feb 15

**Ardhra Nair & Swati Shinde Gole** | TNN

**Pune:** Colleges in Maharashtra will reopen on February 15 after a 10-month hiatus due to the Covid-19 pandemic, higher education minister Uday Samant said on his social media handle on Wednesday.

"The colleges will reopen with 50% attendance of students at a time and hostels will reopen in the second phase. Universities will conduct examinations in both online and offline modes. Compulsory 75% attendance rule to appear for examinations has been scrapped and universities will come up with a rule on attendance based on both online and offline presence," Samant said.

"Institutes will have to follow University Grants Commission guidelines on reopening and should also discuss with the local administration," he added.

Sanjay Kharat, principal of Modern College here, said, "There was an urgent need for colleges to reopen considering that practical sessions of students are pending. We have already formed batches of 50 students each for laboratory sessions and will begin with them immediately."

Students from across political and other affiliations, who have been demanding reopening of colleges, expressed joy about the development.

The higher education department was receiving a lot of flak for the delay in reopening colleges, especially after the state decided to reopen schools (class IX to XII) from November 23 and class V to VIII from January 27.

# महाविद्यालये १५ पासून सुरू



- उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत
- ७५ टक्के उपस्थितीची अट शिथील

प्रतिनिधी
मुंबई

राज्यातील सर्व महाविद्यालये सुरू होणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी मुंबईत पत्रकार परीषदेत केली. युजीसी गाईड लाईन्सनुसार राज्यात १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये पुन्हा सुरू करण्यास परवानगी दिली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**मुख्यमंत्र्यांकडून संमती**

मंत्री सामंत म्हणाले, राज्यातील कुलगुरुंनी महाविद्यालये सुरु करण्याची मागणी केली होती. याबाबत निर्णय घेण्यासाठी तीन दिवसांपूर्वी १३ कुलगुरूंची बैठक झाली. आवश्यक ती खबरदारी घेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी दिली. येत्या १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालय सुरू होणार असल्याचे मंत्री उदय सामंत यावेळी म्हणाले.

**...अशी असेल प्रक्रिया**

१५ फेब्रुवारी ते ५ मार्चपर्यंत ५० टक्के उपस्थितीचा पहिला टप्पा असेल. त्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल. महाविद्यालयांनी दिवसाआड उपस्थितीचे नियोजन करावे. कोरोनाबाबतचे सर्व नियम पाळून वर्ग सुरु करण्यास विद्यापिठांना कळवल्याचे ते म्हणाले.

# कर्करोगावरील उपचार होणार सुटसुटीत

## डॉ. कनमडी यांनी केमोथेरपीला दिला पर्याय; 'मॅग्नेटोइलेक्ट्रिक नॅनो पार्टिकल'वर संशोधन

**नंदिनी नरेवाडी - पाटोळे :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : जगभरात कर्करोगावरील अत्याधुनिक उपचारपद्धतीबाबत संशोधन होत आहे. यात केमोथेरपी आणि सर्जरीला पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या उपचार पद्धतींचा समावेश आहे. अशाच पद्धतीच्या साईड इफेक्ट कमी करणाऱ्या 'मॅग्नेटोइलेक्ट्रिक नॅनो पार्टिकल फॉर डायग्नोसिस अँण्ड थेरपी ऑफ कॅन्सर' या विषयावर कोल्हापुरातील डॉ. चिदानंद



**डॉ. चिदानंद कनमडी**

मुरगेप्पा कनमडी यांनी संशोधन केले आहे. सध्या प्रचलित असलेल्या केमोथेरपीत कर्करोगाच्या पेशीसोबत शरीरातील इतर अवयवांवर परिणाम होऊन रुग्णांना अधिक त्रासाला सामोरे जावे लागते. डॉ. कनमडी यांनी संशोधन केलेल्या थेरपीत शरीरातील कर्करोगाच्या पेशींना 'लक्ष्य' करून नॅनो पार्टिकल्सचा वापर करून उपचार केले जाणार आहेत. 'मॅग्नेटोइलेक्ट्रिक नॅनो पार्टिकल फॉर डायग्नोसिस अँण्ड थेरपी ऑफ कॅन्सर' या विषयावरील संशोधनात त्यांनी मॅग्नेटिक व इलेक्ट्रिकचा वापर करून रुग्णांना दिलेल्या औषधांचा शरीरातील नेमक्या कर्करोगाच्या पेशींवरच उपचार केला जाणार आहे. त्यांच्या संशोधनामुळे कर्करोगावरील उपचार पद्धती नेमकी व सुटसुटीत होण्यास मदत होणार आहे.

डॉ. कनमडी मूळचे सांगलीतील जत तालुक्यातील खोजनवाडीचे. शिवाजी विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयातून त्यांनी एमएस्सीचे शिक्षण घेतले. त्यानंतर साऊथ कोरियामध्ये पुकयोंग नॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये कर्करोगावरील उपचार पद्धतीत वापरल्या जाणाऱ्या औषधांमधील मटेरियलबाबत संशोधन सुरू केले. त्यांनी स्पेनमधील इन्स्टिट्यूट ऑफ मटेरियल सायन्स, बार्सिलोना येथेही दोन वर्षे संशोधन केले. या संशोधनासाठी त्यांना जेएई पोस्ट डॉक्टरल फेलोशिप मिळाली आहे.

### ३२ शोधनिबंध प्रसिद्ध

डॉ. कनमडी यांचे ३२ शोधनिबंध प्रसिद्ध झाले असून, ते मटेरियल्स टुडे प्रोसिडिंग या नामांकित आंतरराष्ट्रीय नियतकालिकाचे संपादक आहेत. सध्या ते कागल तालुक्यातील देवचंद कॉलेजमध्ये सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थी पीएच.डी.चे शिक्षण घेत आहेत. सध्या ते कोल्हापुरातील आर.के.नगर परिसरात राहतात.

# एमबीएसाठी प्रवेशासाठी अर्ज करण्याची उद्या अंतिम मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए. अधिविभागात प्रवेश घेण्यासाठी ५ फेब्रुवारी दुपारी ४ वाजेपर्यंत अंतिम मुदत आहे. तरी एमबीए, एमएमएस, सेट२०२०, मॅट, शासनाच्या आदी परीक्षा देणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील एमबीए अधिविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

# अधिकार मंडळाच्या मान्यतेनंतर महाविद्यालये सुरु

## कुलगुरु डॉ. शिर्के यांची माहिती : वसतिगृह पुन्हा ताब्यात

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शासन आदेशानुसार उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्वच विद्यापीठांना महाविद्यालये सुरू करण्याबाबत मार्गदर्शक सुचना जाहीर केल्या आहेत. शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे हा विषय विद्यां परिषद व व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवून मान्यता घेतली जाणार आहे. त्यानंतर प्रमाण संहिता (एसओपी) तयार करुन महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात सूचना दिल्या जाणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.



महाविद्यालये सुरु करण्यासंदर्भात कणसे समिती नेमली आहे. शासन आदेशानुसार पुन्हा एकदा कणसे समितीची बैठक घेतली जाईल. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेवूनच अधिविभाग व महाविद्यालये सुरू केली. जातील. कोरोना काळामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयाची वसतिगृह अलगीकरण केंद्रासाठी जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात दिली होती. ही वसतिगृह जिल्हा प्रशासनाकडून विद्यापीठ व महाविद्यालयाच्या पुन्हा ताब्यात आली आहेत. या वसतिगृहांची स्वच्छता व सॅनिटायझेशन सुरू असून येत्या काही दिवसातच सर्वच वसतिगृहांचे निर्जंतुकीकरण केले जाणार आहे., असेही त्यांनी सांगितले.